## Hindi Vidya Prachar Samiti's

# Ramniranjan Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce (Empowered Autonomous College)

**Affiliated to**

**UNIVERSITY OF MUMBAI**

**Syllabus For T.Y.B.A. Sem V (level 5.5 under NEP-2020)**
**Program: B.A. MARATHI**
**Program Code: RJMAR**

**Course: Marathi Major DSE – Option 1**
**Course Code: RJDSEMAR351**

**Sem. V (level 5.5)**
**CBCS**
**Multidisciplinary Degree Program with Multiple entry and Exit (NEP-2020)**

**2025-26**

## DISTRIBUTION OF TOPICS AND CREDITS

### TYBA Marathi Major DSE – Option 1 Syllabus Semester V

| Course code | Nomenclature | Credits | Topics |
|---|---|---|---|
| RJDSEMAR351 | मराठी प्रमुख विषयविशिष्ट वैकल्पिक अभ्यासपत्रिका - विकल्प क्र.१<br><br>ग्रामीण साहित्य | **४** | १. ग्रामीण साहित्य- संकल्पना व मराठीतील परंपरा.<br>२. शिळान अधिक आठ कथा- उद्धव शेळकेलिखित कथासंग्रह<br>३. उसवण- देवीदास सौदागरलिखित कादंबरी<br>४. भुईशास्त्र- ऐश्वर्य पाटेकरलिखित कवितासंग्रह |

## प्रास्ताविक

## मराठी भाषा आणि मराठी साहित्य का अभ्यासायचं?

मानवी भाषा हे भावना-विचार यांच्या संप्रेषणाचं अत्यंत महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मातृभाषा ही मानवाला आईच्या गर्भात असल्यापासून अवगत असणारी गोष्ट आहे. जन्माला आल्यापासून आपण भाषा ऐकतो, ती आत्मसात करू लागतो,मग हळू हळू बोलू लागतो. आपल्या रोजच्या जीवनव्यवहारात श्वासाइतकीच भाषेची अपरिहार्य गरज आपल्याला असतोच. कारण माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे आणि भाषा हे समाजव्यवहाराचं अविभाज्य अंग आहे. त्यामुळे भाषाप्रभुत्व ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. दैनंदिन व्यवहारापुरता भाषेचा वापर मर्यादित नाही. उत्तम भाषेचा संस्कार हा तुमच्या जगण्याला दिशा देणारा, जीवन घडवणारा असतो. भाषा तुमच्या भावनिक, सांस्कृतिक गरजांचं भरणपोषण करून व्यक्तिमत्त्वविकास घडवते.

भाषेचं हे सामर्थ्य लक्षात घेता,तिचं स्वरूप समजून घेणं, तिचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणं किती अनिवार्य आहे हे तुमच्या लक्षात येईल.

प्रत्येक समाजाच्या भाषेची अशी काही खास वैशिष्ट्यं असतात..त्या त्या समाजाच्या भाषेमध्ये निर्माण होणारं साहित्य म्हणजे त्या समाजाचा भावनिक उद्गार असतो.त्या समाजातील साहित्य हे मानवी समाजाचं प्रतिबिंब असतं, असं मानलं जातं. प्रत्येक समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक इ. परिस्थितीचा अभ्यास करायचा झाल्यास, त्या समाजात निर्माण झालेल्या साहित्याचा अपरिहार्यपणे आधार घ्यावा लागतो. म्हणजेच, साहित्याच्या अभ्यासाने या सर्व घटकांचं भान येतं,ज्ञान प्राप्त होतं. भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाने आपण ज्ञानसमृद्ध आणि भावसंपन्न होतो.

मराठी भाषेला आणि साहित्याला अकराव्या शतकापासूनची प्रदीर्घ परंपरा आहे.

"माझा मऱ्हाटाची बोलु कवतिके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥"

या शब्दांत ज्ञानदेवांनी आपल्या भाषेचं सामर्थ्य व्यक्त केलं . या सामर्थ्याची ओळख आपण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करून घेणार आहोत.

## आर.जे.मध्ये मराठी साहित्याचा अभ्यास का निवडायचा?

आपल्या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९६३ पासून मराठी विभागही अस्तित्वात आला.. म्हणजेच मराठी विभागाला जवळजवळ ६० वर्षांची परंपरा आहे. मराठी विभागाबरोबरच मराठी वाङ्मय मंडळाचीही स्थापना झाली. अभ्यासक्रमाबरोबरीनेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा आणि त्यांची वाङ्मयीन अभिरूची सुसंस्कारित व्हावी यांसाठी मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ भाषाविषयक विविध नवनवीन उपक्रमांचं आयोजन करीत असतं. प्रसिद्ध लेखकांची व्याख्यानं, लेखकांशी संवाद साधणाऱ्या मुलाखती, अभ्यासक्रमावर आधारित वृत्तांतलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा तसंच 'आविष्कार' भित्तिपत्रक व हस्तलिखित व इ-अंक यांचंही आयोजन केलं जातं. मुलाखत तंत्र समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुलाखतीची संधी उपलब्ध करून दिली जाते.

या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी कौशल्यविकसन तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रमही मराठी विभागातर्फे घेतले जातात...जसे मराठी भाषा आणि मराठी साहित्यातील संवाद आणि मानवी मूल्य. या अभ्यासक्रमाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या दिशा उपलब्ध होऊ शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना व्यावसायिक उपयोजन, कौशल्य विकसन व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही गरज ओळखून उपयोजित मराठी, मराठी युनिकोड टंकलेखन, प्रमाण मराठी लेखन आणि मुद्रितशोधन कार्यालयीन पत्रव्यवहार , अर्जलेखन, वृत्त-वृत्तांतलेखन यांबरोबरच भाषांतर, जाहिरातलेखन, ग्रंथपरीक्षण या घटकांचाही अभ्यासक्रमात समावेश केला आहे.

तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमाची आखणी विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांसाठी उपयुक्त होईल,याचे भान ठेवून केली आहे.

विद्यार्थ्यांनी मराठी या विषयाची निवड केल्यास व्यवहारचतुर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण होईल, अशी खात्री वाटते.

# कला व मानव्यविद्या स्नातक पदवी अभ्यासक्रमाची निष्पत्ती (PO)

सर्व कला व मानव्यविद्या स्नातक पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या पुढील क्षमता विकसित होतील :

**१. विद्याशाखीय ज्ञान**

पदवी अभ्यासक्रमातील विविध अभ्यासविषयांचे सर्वसमावेशक ज्ञान आणि विविधांगी आकलन विकसित होणे.

**२. चिकित्सक विचार**

जीवनात वा नोकरी-व्यवसायात उद्भणाऱ्या विषयाचे समग्रतेने आकलन करून त्या संदर्भात निश्चित भूमिका घेता येणे.अशा चिकित्सक विचारातून कुशाग्र बुद्धीने विविध संदर्भात अनुभवांचे आकलन मूल्यमापन करता येणे. शिवाय जगाकडे विभिन्न परिप्रेक्ष्यातून पाहता येणे.

**३. प्रभावी संवादकौशल्ये / संप्रेषणकौशल्ये**

संप्रेषणासाठी आवश्यक असणारी ऐकणे , बोलणे, वाचणे आणि लिहिणे ही मूलभूत भाषिक कौशल्ये विकसित होणे. त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी प्रभावीपणे संवाद साधता येणे. संप्रेषणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करता येणे आणि सर्व उपलब्ध माध्यमांचा प्रभावी वापर करून लोकांशी जोडून घेता येणे. इंग्लीश, हिंदी या भाषांमधे संवादकौशल्ये विकसित होणे पण स्थानिक भाषा मराठीतही संवादकौशल्ये विकसित होणे हे अधिकचे कौशल्य प्राप्त करणे.

**४. विश्लेषक व तार्किक क्षमता**

मिळालेल्या माहितीची सत्यता आणि विषयाच्या संदर्भातील प्रस्तुतता पडताळणे, प्रस्थापित वा विरोधी विचारमांडणीतील तार्किक आणि सांकल्पनिक चुका ओळखता येणे, वेगवेगळ्या प्रकारे जमा झालेल्या सामग्रीचे विश्लेषण आणि संश्लेषण करणे, निष्कर्ष काढता येणे, अनुभव, पुरावे व उदाहरणांच्या आधारे ते सिद्ध करणे आणि परस्परविरोधी दृष्टिकोणांचे अस्तित्व मान्य करता येणे.

**५. संशोधन कौशल्ये**

विविध विषयांसंदर्भात कुतूहल व प्रश्न उपस्थित करून चौकस बुद्धीने शोध घेण्याची वृत्ती, अभ्युपगम स्थापित करणे, संख्यात्मक वा गुणात्मक पद्धतींचा वापर करून मिळवलेल्या सामग्रीचे विश्लेषण आणि संश्लेषण अर्थनिर्णयन करणे व निष्कर्ष काढणे व अभ्युपगम सिद्ध करणे.

**६. उपयोजन व समस्या**

आत्मसात केलेल्या ज्ञानाचे उपयोजन करण्याचे कौशल्य विकसित होणे व या उपयोजनाच्या आधारे प्रत्यक्ष समाजजीवनातील प्रश्नांची / समस्यांची सोडवणूक करण्यासाठी योजना आखता येणे व अपरिचित अशा परिस्थितीत ज्ञानाचे उपयोजन करण्याचे कौशल्य विकसित होणे .

**७. तंत्र साक्षरता**

माहिती तंत्रज्ञानाचा वापर वेगवेगळ्या प्रकारच्या अध्ययन परिस्थितीत करता येणे. माहितीचे विविध उपयुक्त स्त्रोत वापरता येणे, माहितीच्या विश्लेषणासाठी विविध आज्ञाप्रणालींचा उपयोग करता येणे.

**८. बहुसांस्कृतिकतेची जाण**

वेगवेगळ्या संस्कृती, त्यांच्या वेगवेगळ्या मूल्यव्यवस्था, श्रद्धा यांचे सह-अस्तित्व व वैश्विक परिप्रेक्ष्याचे भान असणे, बहुसांस्कृतिक समाजात अर्थपूर्ण व परिणामकारक पद्धतीने जगण्याच्या क्षमता विकसित होणे.

**९. सामाजिक संबंध , संघभावना, सहकार्य**

परस्परांचा आदर करणे, वाद मिटवून सन्मान्य तोडगा काढता येणे. वेगवेगळ्या प्रकारच्या समूहांमधे काम करता येणे. समाजमान्यतेच्या संकेतचौकटींचे भान निर्माण होणे.

**१०. जबाबदार नागरिक**

समाजसेवा, राष्ट्रीय कर्तव्ये यांचे भान राखून राष्ट्राच्या विकासात योगदान देणे, बांधवांविषयी सौहार्द व सहानुभाव निर्माण होणे.

**११. प्रामाणिकपणा ,सचोटी आणि नीतिमत्ता**

वेगवेगळ्या मूल्यव्यवस्था आणि मूल्ये यांचा आदर करणे. निर्णयप्रक्रियेमधे नैतिक मूल्यांना सर्वोच्च स्थान देणे

**१२. पर्यावरण आणि शाश्वत विकास**

पर्यावरणविषयक समस्यांचे भान निर्माण होणे आणि शाश्वत विकासाचे व्यापक ध्येय ठेवून प्रश्न सोडविणे.

**१३. निरंतर शिक्षण**

कोणत्याही परिस्थितीत अनुभवांतून आनंदाने शिकता येणे. कायम शिकण्याची प्रवृत्ती वाढीस लागणे व त्यातील आनंद ओळखता येणे.

## मराठी भाषा आणि साहित्य स्नातक : अपेक्षित गुणवैशिष्ट्ये/ मराठी भाषा आणि साहित्य स्नातक अभ्यासक्रमाची निष्पत्ती(PSO)

१. साहित्यवाचनाची आवड आणि अभिरूची विकसित होणे.
२. साहित्याचे आकलन आणि रसग्रहणाची क्षमता निर्माण होणे.
३. साहित्याचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होणे.
४. साहित्यिक प्रक्रिया व पद्धती याविषयी स्पष्टतेने व स्वतंत्रतेने व्यक्त होता येणे.
५. मराठी भाषा आणि साहित्य या क्षेत्रातील सैद्धांतिक मांडणी व सद्य घडामोडी यांचे ज्ञान असणे.
६. विविध साहित्यप्रकार आणि साहित्यप्रवाह यांची वैशिष्ट्ये यांचे भान निर्माण होणे व त्या चौकटीच्या पार्श्वभूमीवर साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन व मूल्यमापन करण्याच्या क्षमता निर्माण होणे.
७. प्रस्थापित विचारधारा, समीक्षापद्धती यांचे ज्ञान होणे आणि नवीन, बंडखोर, स्वतंत्र विचारधारा, समीक्षापद्धती यांचे स्वागत करण्याची मानसिकता घडणे.
८. मराठी भाषा आणि साहित्यपरंपरा याविषयी भान आणि बांधिलकी निर्माण होणे.
९. सर्जनशील व चिकित्सक अशा दोन्ही प्रकारच्या क्षमता व दोन्ही स्वरूपाचे लेखन करण्याची क्षमता निर्माण होणे.
१०. मूलभूत भाषिक कौशल्यांसह मराठी भाषा आणि साहित्याशी निगडीत , भाषांतर, प्रकाशन, सांस्कृतिक पत्रकारिता, निवेदन आणि सूत्रसंचालन, ग्रंथपरीक्षण, संगणकीय टंकलेखन, मुद्रितशोधन यांसारख्या व्यवसायक्षेत्रात काम करण्यास सक्षम होणे.
११. सामाजिक संवेदनशीलतेची जडणघडण होणे.

**T.Y.B.A. Marathi Major DSE- Option 1 Syllabus Semester V**

| | | |
|---|---|---|
| SEMESTER | : | V |
| CATEGORY UNDER NEP | : | Marathi Major DSE |
| TITLE OF THE SUBJECT/COURSE | : | Rural Literature in Marathi |
| COURSE CODE | : | RJDSEMAR351 |
| CREDITS | : | 4 |
| DURATION | : | 60 Hours |

| **T.Y.B.A.**<br>**तृतीय वर्ष,**<br>**कला शाखा** | **Marathi Major DSE -Option 1**<br>**मराठी प्रमुख विषयविशिष्ट वैकल्पिक अभ्यासपत्रिका - विकल्प क्र.१**<br>**ग्रामीण साहित्य** |
|---|---|
| **अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे (Learning Objective):** | |
| १. | साहित्य व समाज यांच्या संबंधांविषयी जाण निर्माण करणे. |
| २. | ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमागील प्रेरणा आणि सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती यांच्या संबंधाची जाणीव निर्माण करणे. |
| ३. | मराठीतील ग्रामीण साहित्याची साहित्याच्या परंपरेची तोंडओळख करून देणे. |
| ४. | साहित्यकृतींच्या समाजशास्त्रीय समीक्षेचा परिचय करून देणे. |
| ५. | ग्रामीण साहित्य प्रवाहातील साहित्यकृतीचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष अभ्यास, आकलन, विश्लेषण करण्याच्या क्षमता निर्माण करणे. |
| ६. | सामाजिक संवेदनशीलता निर्माण करणे. |

| CO. No. निष्पत्ती क्र. | **अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (Course Outcome):** | PSO Addressed | BLOOMS LEVEL |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांमधे साहित्य व समाज यांच्या संबंधांविषयी जाण निर्माण होईल. | 4,5,6,7, | BT level I, II, IV, V Remember, Understand, analyze, evaluate |
| २ | विद्यार्थ्यांना ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमागील प्रेरणा आणि सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती यांच्या संबंधांविषयी जाणीव निर्माण होईल. | 4,5,6,7 | BT level I, II, IV, V Remember, Understand, analyze, evaluate, |
| ३. | विद्यार्थ्यांना मराठीतील ग्रामीण साहित्याची साहित्याच्या परंपरेची तोंडओळख होईल. | 4,5,6,7 | BT level I, II, IV, Remember, Understand, analyze |
| ४. | विद्यार्थ्यांना साहित्यकृतींच्या समाजशास्त्रीय समीक्षेचा परिचय होईल. | 1,2,3,4,5,6,7,9 | BT level I, II and III, IV, V, VI Remember, Understand, apply, Analyze, Evaluate, and Create |
| ५. | विद्यार्थ्यांमधे ग्रामीण साहित्य प्रवाहातील साहित्यकृतीचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष अभ्यास, आकलन, विश्लेषण करण्याच्या क्षमता निर्माण होतील. | 1,2,3,4,5,6,7,9 | BT level I, II and III, IV, V, VI Remember, Understand, apply, Analyze, Evaluate, and Create |
| ६. | विद्यार्थ्यांमधे सामाजिक संवेदनशीलता निर्माण होईल. | 11,12 | BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing |

**रामनिरंजन झुनझुनवाला कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

**T.Y.B.A. Marathi Major DSE- Option 1 Syllabus Semester V**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **सत्र- ५** | | **तासिका**<br>**L** | **श्रेयांक**<br>**Cr** |
| | **मराठी (प्रमुख विषयविशिष्ट वैकल्पिक) अभ्यासपत्रिका - विकल्प क्र. १**<br>**ग्रामीण साहित्य** | **RJDSEMAR351** | **६०** | **४** |
| | ***घटक- १*** | | **१५** | **०१** |
| | ***ग्रामीण साहित्य- संकल्पना व मराठीतील परंपरा.*** | | | |
| अ. | ग्रामीण साहित्य- संकल्पना, ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि प्रवृत्ती आणि त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध. | | | |
| आ. | मराठीतील ग्रामीण साहित्याची परंपरा, धावता आढावा आणि ठळक टप्पे. | | | |
| | ***घटक- २*** | | **१५** | **०१** |
| | ***शिळान अधिक आठ कथा*** **(कथासंग्रह), उद्धव शेळके, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,१९८२** | | | |
| अ. | या कथासंग्रहातील कथांच्या आशयाचे ग्रामीण संवेदनाशीलतेच्या संदर्भात वाचन व अभ्यास. | | | |
| आ. | या कथासंग्रहातील कथांच्या कथानक, पात्र, वातावरणनिर्मिती, निवेदन, भाषा इत्यादी घटकांचा ग्रामीण संवेदनाशीलतेच्या संदर्भात अभ्यास. | | | |
| | ***घटक- ३*** | | **१५** | **०१** |
| | ***उसवण*** **(कादंबरी), देवीदास सौदागर, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, २०२४** | | | |
| अ. | या कादंबरीच्या आशयाचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या संदर्भात अभ्यास. | | | |
| आ. | या कादंबरीच्या कथानक, पात्र, वातावरणनिर्मिती, निवेदन, भाषा इत्यादी घटकांचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या संदर्भात अभ्यास. | | | |
| | ***घटक-४*** | | **१५** | **०१** |
| | ***भुईशास्त्र*** **(कवितासंग्रह), ऐश्वर्य पाटेकर, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, २०११** | | | |
| अ. | या संग्रहातील कवितांच्या आशयाचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या संदर्भात अभ्यास. | | | |
| आ. | या संग्रहातील कवितांच्या लयबद्धता अनेकार्थता, भावात्मकता, प्रतिमा-प्रतीक-रूपक-मिथक यांसारखी भाषिक वैशिष्ट्ये इत्यादी घटकांचा ग्रामीण संवेदनशीलतेच्या संदर्भात अभ्यास. | | | |

**संदर्भासाठी पुस्तकांची यादी -**


१. ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि समस्या- आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाउस, १९७९.
२. ग्रामीणता-साहित्य आणि वास्तव - आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८९.
३. ग्रामीण साहित्य :स्वरूप आणि शोध, नागनाथ कोतापल्ले मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८६.
४. ग्रामीण साहित्य: एक चिंतन, द. ता. भोसले, मेहता पब्लिशिंग हाउस,१९८०.
५. ग्रामीण साहित्य, रा. रं. बोराडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,१९९२
६. ग्रामीण साहित्य:प्रेरणा आणि प्रयोजन, श्रीराम गुंदेकर, दिलीपराज प्रकाशन,पुणे, १९९९.
७. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, चंद्रकुमार नलगे, सुरेश एजन्सी, पुणे १९९६.
८. तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा, बाबा पाटील आणि आनंद यादव, मेहता पब्लिकेशन, पुणे,१९८१.
९. साठोत्तरी साहित्य प्रवाह: भाग १(ग्रामीण साहित्यासंबंधी आणि अन्य लेख) प्रल्हाद लुलेकर, सायन पब्लिकेशन पुणे,२०१४.
१०. मराठी वाङ् मयाचा इतिहास - खंड ५, भाग १ - संपादक - रा. श्री. जोग, म.सा.परिषद, पुणे, १९७३.
११. कादंबरीविषयी - हरिश्चंद्र थोरात. पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.
१२. टीकास्वयंवर - भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.
१३. कादंबरी - एक साहित्यप्रकार - हरिश्चंद्र थोरात, शब्द पब्लिकेशन्स ,मुंबई, २०१०.
१४. मराठीवाङ्मय कोश-खंड ४, ( समीक्षा संज्ञा), समन्वयक संपादक- डॉ. विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्यसाहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२ .
१५. वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश - संपादक, प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके व इतर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००९.
१६. धार आणि काठ - नरहर कुरुंदकर, १९७१.
१७. साहित्य स्वरूप आणि समीक्षा, वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर, मुंबई, १९७५.

**T.Y.B.A. SEM – V**

**तृतीय वर्ष कला शाखा सत्र ५**

**मराठी(प्रमुख विषयविशिष्ट वैकल्पिक) अभ्यासपत्रिका- विकल्प क्र. १ (RJDSEMAR351)**

**परीक्षा योजना-**

१. सातत्यपूर्ण मूल्यमापन पद्धतीचा अवलंब केला जाईल. त्या अंतर्गत दोन तास कालावधीची ६० गुणांची सत्रांत परीक्षा व ४० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन होईल.

२. उत्तीर्ण होण्यासाठी सत्रांत परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन दोन्ही मिळून किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक आहे.

३. सत्रांत परीक्षेला बसणे अनिवार्य आहे. सत्रांत परीक्षेला न बसणारा विद्यार्थी अनुत्तीर्ण घोषित होईल.

४. राष्ट्रीय पातळीवरील अथवा तत्सम स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे किंवा आजारपणामुळे जे सत्रांत परीक्षेला बसू शकणार नाहीत त्या विद्यार्थ्यांची प्राचार्यांच्या विशेष परवानगीने पूरक परीक्षा घेण्यात येईल.

५. प्राचार्यांच्या सोबत विचारविनिमयाने घेतलेला विभागप्रमुखांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**पंचम सत्रांत परीक्षा – गुण ६०**

वरील अभ्यासपत्रिकेचे प्रथम सत्रान्त प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले आहे.

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १५

प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १५

प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १५

प्रश्न ४. घटक ४ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १५

**अंतर्गत मूल्यमापन – गुण ४०**

श्रेयांकन व्यवस्थेचा एक आवश्यक भाग म्हणून एक चाचणी परीक्षा / गृहपाठ / प्रश्नमंजुषा / सादरीकरण आणि एक प्रकल्प घेतला जाईल. अंतर्गत परीक्षेचा तपशील आणि गुणविभागणी पुढीलप्रमाणे -

चाचणी परीक्षा/ गृहपाठ / प्रश्नमंजुषा / सादरीकरण - २५ गुण

प्रकल्प /गृहपाठ / प्रश्नमंजुषा / सादरीकरण - १५ गुण

**T.Y.B.A. Marathi Major DSE- Option 1 Syllabus Semester V**

**Mapping of Questions unit wise to Blooms Taxonomy**

| Unit | Question | Remembering and understanding, | Analyzing, Evaluating | Total Marks |
|---|---|---|---|---|
| **I** | 1 | 1 | 5 | 15 |
| **II** | 2 | 5 | 10 | 15 |
| **III** | 3 | 5 | 10 | 15 |
| **IV** | 4 | 5 | 10 | 15 |
| **Total** | | **25** | **35** | **60** |
| **% Weightage** | | **42** | **58** | **100 %** |

**15 Marks Project mapped to application and Create level of Blooms' Taxonomy Model**

**Project/Assignments Assessment Rubrics**

| Parameters | Marks | (80 to 100%) Excellent | (60 to 80%) Good | (40 to 60%) Satisfactory | (20 to 40%) Average |
|---|---|---|---|---|---|
| **Content and Analysis written** | **8** | **6.4-8/8** | **4.8-6.4/8** | **3.2 - 4.8/8** | **1.6- 3.2/8** |
| **Creativity and Innovation in point of view and Analysis** | **4** | **3.2-4/4** | **2.4-3.2/4** | **1.6 -2.4/4** | **0.8 -1.6/4** |
| **Language Presentation and Communication Skills** | **3** | **2.4-3/3** | **1.8-2.4/3** | **1.2-1.8/3** | **0.6-1.2/3** |

**25 Marks Test/ Presentation/Assignments/Project mapped to application, analyse, evaluate and Create level of Blooms' Taxonomy Model**

**Project/Assignments Assessment Rubrics**

| Parameters | Marks | (80 to 100%) Excellent | (60 to 80%) Good | (40 to 60%) Satisfactory | (20 to 40%) Average |
|---|---|---|---|---|---|
| **Content and Analysis written** | **10** | **8-10/10** | **6-8/10** | **4-6/10** | **2-4/10** |
| **Creativity and Innovation in point of view and Analysis** | **10** | **8-10/10** | **6-8/10** | **4-6/10** | **2-4/10** |
| **Language Presentation and Communication Skills** | **5** | **4-5/5** | **3-4/5** | **2-3/5** | **1-2/5** |

## अध्ययन अध्यापन प्रक्रिया(Teaching Learning Process)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, शिक्षणप्रक्रियेच्या केंद्रस्थानी विद्यार्थी आणि त्यांच्याद्वारा होणारे अध्ययन असते. तसेच विद्यार्थ्यांचा समग्र व्यकितमत्त्व विकास, कौशल्यविकसनावर भर, बहुविद्याशाखीय शिक्षण ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत अमलात आलेल्या शैक्षणिक रचनेची वैशिष्टये आहेत. याचे भान ठेवून अध्यापनपद्धती निवडल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मूलभूत भाषिक कौशल्यांबरोबरच मराठी भाषेशी निगडीत विविध व्यवसायक्षेत्रात भाषिक ज्ञानाचे उपयोजन करण्याचे कौशल्यही आत्मसात केले पाहिजे हे अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिकण्याची प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी अभ्यासक्रमात नेमलेल्या साहित्यकृतींच्या वाचनात व अर्थनिर्णयनात विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग असावा या हेतूने पुढील विविध पद्धतींचा अवलंब केला जातो-

१. व्याख्यान - अभ्यासक्रमातील सैद्धांतिक, वर्णनात्मक, शास्त्रीय भागासाठी व्याख्यान पद्धती.
२. गटचर्चा- नेमलेल्या साहित्यकृतीच्या अर्थनिर्णयनासाठी.
३. अभिवाचन- कविता नाटक इत्यादींचे अभिवाचन, प्राध्यापकांद्वारा ध्वनिमुद्रित फिती.
४. सादरीकरण- विद्यार्थ्यांद्वारा साहित्यकृतीचे आकलन, विश्लेषण व रसास्वाद यांचे सादरीकरण. (सहाध्यायी अध्यापन, भूमिकांतर अध्यापन)
५. विद्यार्थ्यांद्वारे प्रकल्प / कार्यक्रम- यातून प्रत्यक्ष भाषिक कौशल्यांच्या उपयोजनाचा कार्यानुभव.
६. क्षेत्रभेट - वर्गात शिकलेल्या साहित्यप्रकारवैशिष्ट्ये, प्रवाह, बोली यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधी.
७. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर- चित्रपट, लघुचित्रपट, माहितीपट, यूट्यूब व समाजमाध्यामांवरील ध्वनिफिती, चित्रफिती(ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स) पीपीटी
८. गुगल मीट- (ऑनलाईन व्याख्याने), गुगल क्लासरूम्ससारखे, मराठी विभाग यू ट्यूब वाहिनी यांचा समावेश असलेले जीसूट अध्ययन व्यवस्थापन व्यासपीठ, व्हॉट्सपसारखी समाजमाध्यमे- माहिती, अध्ययन साहित्य, प्रकल्प यांच्या देवाणघेवाणीसाठी.

**Mapping of the courses to employability / entrepreneurship / skill development**

| Class | Course Name | Course Code | Unit No. And topics focusing on Employability / Entrepreneurship / Skill development | Employability / Entrepreneurship / Skill development |
|---|---|---|---|---|
| TYBA Sem V | Marathi Major DSE Paper - Option 1 Rural Literature in Marathi | RJDSEMAR351 | Unit 1: Rural Literature- Concept and Tradition in Marathi<br>Unit 2: *Shilaan Adhik Aath Kathaa* (Short story Collection)<br>Unit 3: *Usavan* (Novel)<br>Unit 4: *Bhueeshaashtra* (Poetry Collection) | 1.Linguistic Skills<br>2. Analytical Skills<br>3. Appreciation Skill<br>4. writing Skills |

**Mapping of Curriculum with relevance to local, regional, national and global Developmental needs**

| Sr. No. | Class | Course Name | Course Code | Units/topics | Relevance |
|---|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br><br>Sem V | Marathi Major DSE Paper - Option 1 Rural Literature in Marathi | RJDSEMAR351 | Unit 1,2,3,4 | Relevance to Local, regional, national and global Developmental Needs |

**Mapping of Curriculum with Cross cutting Issues Viz. Professional Ethics, Gender, human Values, Environment and sustainability**

| Sr. No. | Class | Name of the Course | Course Code | Issues Addressed |
|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br><br>Sem V | Marathi Major DSE Paper - Option 1 Rural Literature in Marathi | RJDSEMAR351 | Environment and Sustainability, Human Values |

**Mapping of Curriculum with Sustainable Development Goals (SDG) and NEP 2020**

| Sr. No. | Class | Name of the Course | Course Code | SDG | NEP 2020 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br><br>Sem V | Marathi Major DSE Paper - Option 1 Rural Literature in Marathi | RJDSEMAR351 | SDG 4 (Quality Education),<br><br>SDG 15 (Life on Land),<br><br>SDG 16 (Peace, Justice and Strong Institution) | Holistic Development<br><br>Analytical Skill Development<br><br>Value Education |